| | |
|---|---|
| MHSN02-000921-2023 | नियमित दिवाणी दावा क्र.१४७/२०२३<br><br>एव्हरेस्ट सिमेंट पाईप इंडस्टीज रजि पार्टनरशीप फर्म<br>वि.<br>एव्हरेस्ट सिमेंट पाईप इंडस्टीज रजी पार्टनरशीप फर्म |

## निशाणी क्र. ०७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वाचला. वादीला वारंवार संधी देवूनही प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज वादीच्या म्हणण्याशिवाय निकाली काढण्यात येतो. प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

२. प्रस्तुत प्रकरणात लेखी जबाब हा ९० दिवसानंतर दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादीने सदरील लेखी जबाब उशीरा दाखल करण्याचे कारण त्यांना सदरील प्रकरणात नोटीस मिळाल्यानंतर जबाब दाखल करेपर्यंत दरम्यान मे २०२४ मध्ये दिवाणी प्रकरणांची सुट्टी असल्याने लेखी जबाब दाखल करण्यास उशीर झालेला आहे असे कथन केलेले आहे.

३. प्रस्तुत प्रकरणात लेखी जबाब नाही असा आदेश पारीत नाही. परंतु प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादींनी लेखी जबाब प्रतिवादींना न्यायालयीन समन्स प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसानंतर दाखल केला असल्याने सदरील विलंब माफी करुन घेणे हे प्रतिवादीला आवश्यक आहे. शिवाय प्रस्तुतचा दावा गुणदोषावर होणे करीता प्रतिवादी यांना स्वतःची बाजू मांडण्याकरीता लेखी जबाब दाखल

करण्याची परवानगी देणे गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. निशाणी क्र.७ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांना लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

ROHINI SAMBHAJI PATIL

Digitally signed by ROHINI SAMBHAJI PATIL
Date: 2024.07.01 16:42:24 +0530

**सांगली.** **(श्रीमती आर.एस.पाटील)**

**दिनांकः ०१/०७/२०२४.** **४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**सांगली.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | P.I.Madrasi<br>(Stenographer (Grade-III)) |
| Court Name | : | Jt. Civil Judge Jr. Division &<br>Judicial Magistrat First Class,<br>Sangli. |
| Date | : | 01/07/2024 |
| Signed by P.O. on | : | 01/07/2024 |
| Uploaded on | : | 01/07/2024 |